

# पुस्तकांची ई-गंगा

**८४वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सध्या ठाण्यात सुरू आहे. या संमेलनाच्या माध्यमातून साहित्यासंबंधी बरंच काही सकारात्मक घडू शकतं आणि त्यातलाच एक भाग आहे तो 'ई-बुक्स' चा.**

अंजली कुलकर्णी

सध्याची माहिती - तंत्रज्ञानाची प्रगती पहाता हे अगदी मनापासून पटत पेन ड्राईव्हसारख्या अत्यंत छोट्या उपकरणात प्रचंड असा माहितीचा खजिना असतो. दिवसेंदिवस त्याहीपेक्षा छोट्या डिव्हाईसमध्ये खूप मोठा [डेटा] सेव्ह होणं शक्य झालंय. अशा सगळ्या गोष्टी घडत असल्यामुळे जगातल्या अनेक गोष्टींनी काळाबरोबर चालण्याची गरज निर्माण झाली आहे आणि त्याला साहित्यही अपवाद नाही. आत्तापर्यंत पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर, कुसुमाग्रज अशा काही साहित्यिकांबद्दल माहिती देणाऱ्या वेबसाईट्सवर त्यांचं साहित्य काही प्रमाणात अपलोड केलेलं दिसतं. चंद्रशेखर गोखलेचं 'मी माझा', गुरु ठाकूर, संदीप खरे यांच्या कविता वेबसाईटवर किंवा त्यांच्या ब्लॉग्जवर वाचायला मिळतात. मध्यंतरी प्रसिद्ध लेखक चं. प्र. देशपांडे यांनी एक अत्यंत स्तुत्य गोष्ट केली. त्यांनी .लहरारिश्रिशज्ञहरप.लो या वेबसाईटच्या माध्यमातून त्यांचं सगळं साहित्य इंटरनेटवर उपलब्ध करून दिलं. कुणालाही त्यांच्या एकांकिका किंवा नाटकांचे प्रयोग करायचे असतील तर त्या संहिता डाऊनलोड करून, प्रिंट्स घेऊन ते प्रयोग केले जाऊ शकतात. अशा पध्दतीने साहित्य जास्तीत जास्त यूजर फ्रेंडली होणं हे महत्त्वाचं आहे.

८४वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सध्या ठाण्यात सुरू आहे. या संमेलनाच्या माध्यमातून साहित्यासंबंधी बरंच काही सकारात्मक घडू शकतं आणि [त्यात]लाच एक भाग आहे तो 'ई-बुक्स' चा. साहित्य संमेलनात अमेरिकेतल्या मंदार जोगळेकरांचा ई-बुक्सचा एक स्टॉल आहे आणि अनेक जणांसाठी विशेषत: तरुणांसाठी हा स्टॉल म्हणजे साहित्य संमेलनाचं मोठं आकर्षण आहे. ई-बुक्सबद्दल लोकांना सांगण्यासाठी या साहित्य संमेलनाचं औचित्य साधून मंदार जोगळेकर खास अमेरिकेहून इथे आलेत. त्यांनी 'ई-बुक्स' या संकल्पनेविषयी सांगितलं, 'सध्याच्या काळात तरुण पिढी कमी वाचते अशी टीका केली जातेय पण वास्तवात असं नाही. आमच्या ई-बुक्सना जो प्रतिसाद मिळतोय तो पहाता तरुणपिढीला नक्कीच साहित्य वाचन यात रुची आहे. आम्ही अडीचशे प्रकाशकांची जवळजवळ वीस हजार पुस्तकांचं लिस्टिंग केलं आहे आणि आम्हाला जाणवतयं की इंटरनेटच्या माध्यमातून आताच्या पिढीतही वाचन संस्कृती वाढते आहे. यंदाच्या दिवाळीत ई-बुक्सच्या माध्यमातून आम्ही दीडशे दिवाळी अंक वाचकापर्यंत पोहोचवले. bookganga.com या साईटवरही ई-बुक्स उपलब्ध आहेत.

ई-बुक्स या संकल्पनेमुळे केवळ वाचकांचा नाही तर लेखकांचाही फायदा होऊ शकतो. कारण एकतर या माध्यमातून एकाचवेळी साहित्य जगभर पोहचू शकतं आणि दुसरं म्हणजे नवीन लेखकांसाठी हे माध्यम फारच दिलासा देणारं आहे. त्याविषयी मंदार जोगळेकर म्हणाले. 'ई-बुक्स'मुळे पुस्तकं छापण्याचा खर्च करावा लागत नाही. शिवाय नवीन लेखकांपुढे मोठा प्रश्न असतो तो पुस्तकांसाठी प्रकाशक मिळण्याचा. कारण एखादं पुस्तक चांगलं होईल का नाही हे प्रकाशक ठरवतात. त्यामुळे अनेक नव्या, होतकरू लेखकाचं लेखन प्रकाशकांच्या निकषाला न उतरल्यामुळे प्रसिद्ध होत नाही. ई-बुक्समुळे तसं होणार नाही. नवीन लेखकांसाठी ई-बुक्स हा उत्तम पर्याय असेल.'

ई-बुक्स डाऊनलोड करण्यासाठी ती विकत घ्यावी लागतात, पण तरीही पायरसी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याविषयी मंदार जोगळेकरांनी सांगितलं, 'ई-बुक' ज्याने विकत घेतलयं फक्त त्याच्याच मशिनवर दिसू शकतं ते कॉपी करता येत नाही. 'पीडीएफ' फॉरमॅट मध्ये न करता त्यासाठी आम्ही वेगळं तंत्रज्ञान विकसित केलयं. त्यामुळे पायरसीला अटकाव होतो.'

सध्या इतर पुस्तकांसोबतच डॉ. नरेंद्र जाधवांचं रवींद्रनाथ टागोरांच्या कवितांवरचं पुस्तक ई-बुकच्या स्वरुपात तयार केलं गेलयं. त्यातल्या कवितांचे ऑडिओजसुध्दा तिथे ऐकायला मिळतात. त्यांच्याच 'आमचा बाप अन् आम्ही' या पुस्तकाच्या ई-बुक्स आवृत्तीत तर काही व्हिडिओजसुध्दा वापरले गेलेत. आत्ताच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष उत्तम कांबळे यांच्या 'आई' या पुस्तकाचं ई-बुक करण्याचंही काम सुरू आहे. लेखक वाचक - प्रकाशक सगळ्यांचाच या ई-बुक्सच्या प्रकल्पाला भरपूर प्रतिसाद मिळतोय. शंभर छापील पुस्तकं विकली जात असतील तर ऐंशी ई-बुक्स विकली जातायत. साहित्य संमेलनातल्या स्टॉलवर हे ई-बुकचं तंत्रज्ञान लोकांना प्रात्यक्षिकासह दाखवलं जातय. तंत्रज्ञानतली वेगवेगळी उपकरणे, आयपॉड वगैरे साहित्य संमेलनात पहिल्यांदाच वापरलं जातंय. या माध्यमातून साहित्य नव्या पिढीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू आहे आणि त्याला अगदी पहिल्या दिवसापासूनच तरुण पिढीचा आणि एकंदरीतच वाचकांचा भरघोस प्रतिसाद मिळतोय.

नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून साहित्य इंटरनेटवर उपलब्ध झाल्याने खरंच बरेच फायदे होतील. दुर्मिळ पुस्तकं संग्रही ठेवणं, त्यांचा वाळवी/धूळ वगैरे पासून बचाव करणं, त्यांची योग्य ती निगा राखणं हे सगळं दिवसेंदिवस जागा आणि वेळेअभावी कठीण होत चाललयं. ई-बुक्समुळे तो प्रश्न सुटेल. शिवाय नव्या लेखकांना त्यांचं लिखाण वाचकांपर्यंत पोहोचण्याचं उत्तम माध्यम मिळेल आणि इथून पुढच्या टेक्नोसॅव्ही पिढ्यांना, त्यांना कम्फर्टेबल आणि फ्रेंडली वाटणाऱ्या माध्यमांतून पुस्तकं मिळतील आणि अर्थातच वाचन संस्कृती वृद्धिंगत होईल, साहित्य हे काळाच्याबरोबर राहील. bookganga.com चे संस्थापक मंदार जोगळेकर यांनी हा ई-बुक्सचा अत्यंत कल्पक प्रयोग केलाय. अमेरिका, पुणे आणि ऑस्ट्रेलियातही त्यांची ऑफिसेस आहेत. त्यांच्या या प्रयत्नाच्या माध्यमातून मराठी साहित्य खऱ्या अर्थाने 'ग्लोबल' होतंय असं नक्कीच म्हणता येईल.